पुणे महानगरपालिका
विधी समिती
कार्यपत्रिका क्र. ६

विधी समितीची पाक्षिक सभा बुधवार दि. १२/०८/२०२६ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता मा. समिती सभागृह, नवीन विस्तारीत ईमारत, पुणे महानगरपालिका येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्र. ११

मा. ॲड. निलेश निकम, विरोधी पक्षनेता, मा. प्रिया गदादे, मा. सौ. स्मिता सुधिर कोंढरे, मा. स्वप्नील दुधाणे, मा. हर्षल टिंगरे यांचे दि. २४/०७/२०२६ चे पत्र.

लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार पुणे महानगरपालिकेतील ज्या सेवकांना वेतनामध्ये घाणभत्ता मिळतो अशा सेवकांच्या एका पात्र वारसास वारसाहक्काने नोकरी मिळते. वारस प्रकरण प्रक्रिया ही संबंधित सेवक सेवानिवृत्त झाल्यानंतर सुरु होते. त्यामुळे पात्र वारस महानगरपालिकेच्या सेवेत रुजू होण्यासाठी जवळपास १ वर्षांचा कालावधी लागतो. पर्यायाने जेवढी वारस प्रकरण सुरु असतात तेवढी पदे रिक्त राहतात.

सबब वेतनामध्ये घाणभत्ता मिळणारा सेवक सेवानिवृत्त व्हायच्या १ वर्ष आधी घाणभत्ता वारस प्रकरणाची प्रशासकीय कारवाई सुरु करण्यात यावी व संबंधित सेवक सेवानिवृत्त झाल्याच्या दुसऱ्या दिवशी वारसाची त्यांच्या रिक्त पदावर नेमणूक करण्यात यावी.

विषय क्र. १२

खातेप्रमुख संवर्गात दहा वर्षापेक्षा जास्त सेवा केलेल्या खातेप्रमुखांचे नामाभिधान 'सह महापालिका आयुक्त' (जॉईंट म्युनिसिपल कमिशनर) असे करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/१६९ दि. १०/०६/२०२६ चे पत्र.

(टिप :- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा, असे दि. २३/०७/२०२७ च्या सभेत ठरले आहे.)

विषय क्र. १३

पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील क्रीडा विभागाकडील क्रीडा अधिकारी या पदाच्या आकृतीबंधामध्ये सुधारणा करणेबाबत मा.महापालिका आयुक्त कार्यालय यांचे जा. क्रं. मआ/साप्रवि/आस्था/३७७ दि. ०५/०८/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका